**FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED**
*(A Government of Maharashtra Enterprise)*

क्रमांक : प्रशा/आस्था-१/न.क्र.९/प्र.क्र.३७५४/818 दिनांक 28 MAY 2025

# परिपत्रक

**विषय: एफडीसीएम चे संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध करणे.**

एफडीसीएम चे संकेतस्थळावर (www.fdcm.co.in) प्रसिद्ध होणारी माहिती सुस्पष्ट, वाचनीय व User Friendly असणे क्रमप्राप्त आहे. तथापि बरेचवेळा तसे होत नसल्याचे माझे निदर्शनास आले आहे. या प्रयोजनार्थ पुढील प्रमाणे निर्देश जारी करण्यात येत आहे.

१.० संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध करण्यासाठी याद्वारे एफडीसीएम मुख्यालयातील श्री स्वप्नील यशवंत मरसकोले, (९३५६८०१९९२), विभागीय व्यवस्थापक, निसर्ग पर्यटन यांना संपर्क अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

२.० संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध करणे हेतू website.info.submission@gmail.com हे एकमेव Email ID उपलब्ध करण्यात आले आहे.

३.० वरीलप्रमाणे नियुक्त संपर्क अधिकारी यांनी व्यवस्थापकीय संचालक कार्यालयाव्यतिरिक्त इतरांकडून प्राप्त होणारी माहिती याच Email ID वर प्राप्त होईल याची खातरजमा करावी.

४.० www.fdcm.co.in या संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध होण्यासाठी संबंधीत अधिकाऱ्यांनी website.info.submission@gmail.com या ई-मेलवरच माहिती पाठवावे. माहितीबाबत खालील तपशिल स्पष्टपणे कळवावेत.

४.१ माहिती संबंधीत इंग्रजी आणि/किंवा मराठी मध्ये स्पष्ट असा मथळा.

४.२ माहितीशी निगडीत पत्र/आदेश/नोटीस/परिपत्रक इत्यादिची वााचनीय असलेली PDF File.

४.३ माहितीशी संबंधी वर्गवारी उदा:-वनोपज/लिलाव/बातमी/कर्मचारी कॉर्नर इत्यादि तसेच मैदानी लिलावातील विक्री बाबतची माहिती.

४.४ माहिती केंव्हा पासून केंव्हा पर्यंत अपलोड करणे आवश्यक आहे. माहिती कायम स्वरूपाची असेल तर स्पष्ठपणे नमूद करावे.

४.५ ज्या कार्यालयाशी संबधी माहिती आहे त्या कार्यालयाने संबंधीत संपर्क अधिकारी/कर्मचारी यांचे नांव व मोबाईल क्रमांक.

४.६ संकेतस्थळावर संग्रह संघटीतरित्या साठविला जाईल व आवश्यकतेनुसार शोधता व वापरता येईल, त्याकरिता आपले अधिनस्त विभागातील विविध वानिकी कामांचे उपलब्ध असलेली उत्कृष्ट छायाचित्रे रोपवनाच्या माहितीसह जसे विभाग/परिक्षेत्र/रोपवन वर्ष/क्षेत्र त्याचप्रमाणे साग रोपवनाची छायाचित्रे (Geotagged) घेण्यात येऊन विशिष्ठ ठिकाणाचे रोपवन कामाचे उत्तम प्रतीचे छायाचित्रे.



**Registered Office** : FDCM Bhavan, 359/B, Hingna Road, Ambazari, Nagpur-440 036
CIN:U45200MH1974SGCO17206 PAN: AAACF2982K GST No. 27AAACF2982K1ZD
Ph.No. 0712-2811905 E-mail:md@fdcm.nic.in gmhqnag12@gmail.com **Website:** www.fdcm.co.in
Circulars 17

Scanned with CamScanner

४.७ संकेतस्थळावर माहिती अपलोड करण्यासाठी काही कालावधी लागणे साहजिक आहे, त्यादृष्टीने संपर्क अधिकारी यांचेकडे पुरेसा वेळ देऊन माहिती पाठविणे इष्ट राहिल.

५.० वरीलप्रमाणे निर्देशाचे तंतोतंत पालन करून आपले कंपनीचे संकेतस्थळावर सुस्पष्ट आणि User Friendly ठेवण्यासाठी सर्व संबंधितांनी सहकार्य करावे.

(संजीव गौड)
व्यवस्थापकीय संचालक

प्रति,

महाव्यवस्थापक (सर्व)
प्रादेशिक व्यवस्थापक (सर्व)
विभागीय व्यवस्थापक (सर्व)
कक्ष प्रमुख (सर्व), व्यवस्थापकीय संचलाक कार्यालय
एफडीसीएम संकेतस्थळ www.fdcm.co.in



**Registered Office** : FDCM Bhavan, 359/B, Hingna Road, Ambazari, Nagpur-440 036
**CIN**:U45200MH1974SGCO17206 **PAN**: AAACF2982K **GST No.** 27AAACF2982K1ZD
**Ph.No.** 0712-2811905 **E-mail**:md@fdcm.nic.in gmhqnag12@gmail.com **Website:** www.fdcm.co.in
Circulars 18

Scanned with CamScanner